# महाराष्ट्र शासन

## सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य

DEPARTMENT OF SAINIK WELFARE, MAHARASHTRA STATE
सत्यमेव जयते
PUNE

## नागरिकांची सनद

## २०२१

अनुक्रमणिका


| अ. क्र. | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **विभागाची सर्व साधारण माहिती** | |
| १. | सैनिक कल्याण विभागाचा संक्षिप्त इतिहास | ४ - ७ |
| २. | माजी सैनिकाची व्याख्या | ७ - ९ |
| ३. | माजी सैनिक/विधवांना ओळखपत्र | ९ |
| ४. | माजी सैनिकांची नोकरीसाठी नोंदणी | १० - ११ |
| ५. | सैनिक कल्याण विभागाच्या अधिपत्याखालील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना/ कार्यक्रम | १२ - १४ |
| | (क) पुनर्वसन महासंचालनालय, नवी दिल्ली | |
| | (ख) केंद्रिय सैनिक मंडळ, नवी दिल्ली | |
| | (ग) राज्य शासनाच्या सवलती/योजना | |
| | (घ) सैनिक कल्याण विभागाच्या कल्याणकारी /विशेष निधीतून राबविण्यात येणाऱ्या योजना | |
| | (च) छात्रपुर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक | |
| ६. | संगणकीकरण | १४ |
| ७. | सैनिक कल्याण विभागाकडून पुरविल्या जाणाऱ्या सेवा त्यासाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे, कालावधी व सेवा पुरविणारा अधिकारी इत्यादि. | १५ - २९ |


Department of Sainik Welfare * Ghorpadi, Pune *

# प्रस्तावना

सैनिक कल्याण विभागाची 'नागरिकाची सनद' प्रसिध्द करताना मला अतिशय आनंद होत आहे. सध्याचे जग हे जागतिकीकरणाकडे वेगाने वाटचाल करीत आहे. या स्पर्धेच्या युगात सर्वच संस्थाना त्यांच्या कामाचा तसेच सेवांचा दर्जा राखणे अत्यंत आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य शासनाच्या स्तरावर सुरु केलेल्या प्रशासकीय सुधारणांच्या कार्यक्रमांत विविध शासकीय विभागांकडून नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांचा दर्जा उंचविण्यासाठीच्या उपाययोजनांवर भर दिला जात आहे. महाराष्ट्र राज्यातील माजी सैनिक व त्यांचे कुटुंबिय हा केंद्रबिंदू मानून शासनाकडून पुरविण्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या सेवा व योजनांची अंमलबजावणी करताना पारदर्शकता, नियमांप्रमाणे काम, कालमर्यादा, कामाचा दर्जा, कार्यक्षमता राखणे व शासकीय सेवा पुरविण्यामध्ये स्तर निश्चित करुन जबाबदारी निश्चित करणे इत्यादि बाबी 'नागरिकाची सनद'' या माध्यमातून साध्य करण्याची संकल्पना आहे. 'नागरिकाची सनदü' चे लोकाभिमुखता, प्रतिसादशिलता, पारदर्शकता व गतिमानता हे महत्वाचे पैलू आहेत. त्या अनुषंगाने सैनिक कल्याण विभागाचे संगणकीकरण करुन www.mahasainik.gov.in ही वेबसाईट दि. १५ मे २००२ पासून सुरु केली असून माहे जून २०१९ पासून या विभागाची वेबसाईट www.maharashtra.gov.in ही होती परंतु सद्या वेबरसाईटचे अद्ययावत करण्याचे काम चालु असल्याने बंद आहे. या वेबसाईटवर विभागाचा संक्षिप्त इतिहास, संपर्कासाठी सैनिक कल्याण विभाग व विभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या सर्व जिल्हा सैनिक कल्याण अधिकाऱ्यांची नांवे, कार्यालयाचा पत्ता, दुरध्वनी क्रमांक, ई-मेलचा पत्ता, माजी सैनिकांच्या मुलां/मुलींसाठी सैनिक कल्याण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या वसतिगृहांची माहिती, वसतिगृह प्रवेश नियम, माजी सैनिकांची व्याख्या आणि त्याच्या विषयी नेहमी विचारले जाणारे प्रश्न व त्यांची उत्तरे, केंद्रिय सैनिक मंडळाकडून सशस्त्र सेना ध्वजदिन निधी (AFFDF)/आर्मी ग्रुप इन्शुरन्स फंड(AGIF), आर्मी सेंट्रल वेल्फेअर फंड (ACWF)/ RMDF मधून दिल्या जाणाऱ्या आर्थिक मदतीबाबतची माहिती, महाराष्ट्र शासनामार्फत दिल्या जाणाऱ्या सवलती, विश्रामगृहे, अशंदायी स्वास्थ योजना, निवृत्ती वेतन, माहितीच्या अधिकारातंर्गत आवश्यक माहिती इत्यादि सेवा घरबसल्या उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

या पुस्तिकेतील पहिल्या भागामध्ये या विभागाची सर्वसाधारण माहिती देण्यात आली आहे. तर दुसऱ्या भागात प्रत्यक्ष 'नागरिकाची सनद' देण्यात आली आहे. भूमीका, कार्य विषयक माहिती, सैनिक कल्याण विभागांतर्गत सर्व जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांमार्फत परविण्यात येणाऱ्या सेवा, त्यासाठी आवश्यक कागदपत्रे, लागणारा कालावधी, सेवा विहित कालावधीत पुरविण्यात आल्या नाहीत तर कोणाकडे तक्रार/संपर्क साधावा त्या अधिकाऱ्यांचे पदनाम, व दूरध्वनी क्रमांक यामध्ये देण्यात आले आहेत. मला खात्री आहे की, यात नमूद केल्यानुसार विहित कालावधीत आवश्यक सेवा माजी सैनिक व त्यांचे कुटुबियांना निश्चित कालमर्यादेत उपलब्ध होतील.

# विभागाची सर्वसाधरण माहिती

## सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्याचा संक्षिप्त इतिहास

१.१. दिनांक २५ मार्च १९१९ रोजी मुंबई सरकार यांच्या युध्दविषयक विभागाच्या (War Department) आदेश क्रमांक-१०६१ अन्वये बॉम्बे सोल्जर्स बोर्डाची स्थापना करण्यात आली. ही स्थापना करण्यापाठीमागचा मुख्य हेतु माजी सैनिकांचे कल्याण हा होता आणि बॉम्बे सोल्जर्स बोर्डाच्या कार्यकक्षेत पुढील कार्यक्रमांचा (Activities चा) समावेश केला होता :-

क) जिल्हयातील युध्दविषयक कामाची नोंद (अभिलेख) तयार करणे.
ख) सैनिकांना जमीन आणि अनुदान प्रदान करणे.
ग) माजी सैनिकांना प्राधान्यक्रमाने शासकीय नोकरी देणे.
घ) युध्दात जखमी झालेल्या आणि अपंग झालेल्या सैनिकांची देखभाल करणे.
च) जे सैनिक सेवारत आहेत त्यांचे सर्व प्रकारचे हितसंबंध अबाधित राखणे.
छ) सैन्यात कपात झाल्यामुळे निर्माण होणा-या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीशी सुसंगत अशा बाबींविषयी सैन्यातील अधिका-यांशी सतत संपर्कात राहणे.
ज) सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलती पुरविणे.

१.२. मुंबई सरकाराचे युध्दविषयक विभागाचे सचिव यांना या बोर्डाचे अध्यक्ष म्हणून नेमण्यात आले होते आणि सचिव, पुनर्वसन समिती यांना या बोर्डाचे सचिव (सेक्रेटरी) नेमण्यात आले होते. तसेच पुढे नमूद केलेले मुख्य आणि सन्माननीय नागरीक यांची या बोर्डाचे सदस्य म्हणून नेमणूक करण्यात आली होती:-

क) ले. कर्नल एच.एच. जाम श्री. रणजितसिंहजी विभाजी के.सी.एस.आय,महाराजा नवागड
ख) मेहरबान पिराजीराव बापुसाहेब घाटगे, सी.एस.आय.सी.आय. इ, चीफ ऑफ कागल
ग) कमिशनर ऑफ सेंट्रल डिव्हिजन
घ) कमिशनर ऑफ सदनर् डिव्हिजन
च) रायबहादुर आर. जी. नाईक, एम. बी. ई.

Department of Sainik Welfare, Ghorpadi, Pune

१.३. सुरुवातीस या बोर्डासाठी पुढे नमूद केल्याप्रमाणे १६ कर्मचा-यांना नियुक्त केले गेले होते.

| | | | |
|---|---|---|---|
| क) | सचिव (सेक्रेटरी) | - | १ |
| ख) | वरिष्ठ लिपिक | - | १ |
| ग) | मुख्य लेखापाल | - | १ |
| घ) | लिपिक | - | ९ |
| त) | शिपाई | - | ४ |
| | एकूण | - | १६ |

१.४. दिनांक ०७ सप्टेंबर १९१९ रोजी त्यावेळच्या भारत सरकारने सेंट्रल रिक्रुटींग बोर्ड बरखास्त केले आणि त्याच्या जागी इंडियन सोल्जर्स बोर्डाची स्थापना केली. असे करण्याचा हेतु असा होता की सैन्यात सेवारत असलेल्या सैनिकांना सैन्य सेवेतून कमी केल्यानंतर आणि सेवारत असताना दिवंगत झालेल्या सैनिकांना तसेच असैनिक या संवर्गातील व्यक्तींना आणि त्यांच्या अवलंबितांना असणा-या समस्यांबाबत तत्कालीन सरकारशी सल्लामसलत सुलभ करण्यात यावी या हेतुने सदर बोर्ड आर्मी डिपार्टमेन्ट ऑफ दि गव्हर्नमेन्टचे बरोबर संलग्न केलेले होते.

१.५. दुस-या महायुध्दात नौदल आणि वायुदल यामध्ये हळूहळू वाढ होत गेली आणि सरंक्षण दलातील या विभागाचे सैनिकांच्या बाबत सुध्दा अशाच प्रकारच्या कल्याणकारी कामाविषयी एखादी संस्था असण्याची गरज भासू लागली होती आणि या कारणामुळे या बोर्डाची पुर्नस्थापना एप्रिल १९४४ मध्ये करण्यात आली.

१.६. दिनांक २४ जुलै १९५० रोजी मुंबई सरकार यांनी, त्यांच्या शासन निर्णय क्रमांक-SD/II/३२९ दिनांक २४-०७-१९५० अन्वये या बोर्डासाठी एक संपूर्ण कालावधीचा सचिव (सेक्रेटरी) यांची नेमणूक केली.

१.७. भारतीय संघराज्यामधील सर्व प्रांतांची भाषावार पुर्नरचना झाल्यानंतर मुंबई प्रांताचे नाव महाराष्ट्र राज्य करण्यात आले आणि त्या अनुषंगाने आता या विभागाचे नाव महाराष्ट्र स्टेट सोल्जर्स सेलर्स अॅन्ड एअरमन्स बोर्ड असे करण्यात आले आणि यानंतर या नावाची सुध्दा पुर्नरचना करण्यात येऊन आता हे नाव सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य असे करण्यात आलेले असून या विभागासाठी पूर्वी नेमणूक केलेल्या सचिव या नावाने ओळखल्या जाणा-या पदाचे संचालक, सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, असे नामकरण करण्यात आले.

Department of Sainik Welfare

१.८.  यानंतर कालपरत्वे सैनिक कल्याण विभागाशी संबंधीत अशा कार्यालयांचे (केंद्रिय, राज्यस्तरीय आणि जिल्हास्तरीय कार्यालयांचे) जे विविध नामकरण करण्यात आले ते पुढीलप्रमाणे आहे.

| बदलाचा दिनांक | केंद्रीय | राज्य | जिल्हा |
|---|---|---|---|
| मार्च १९५१ | इंडियन सोल्जर्स सेलर्स ॲन्ड एअरमेन्स बोर्ड | स्टेट सोल्जर्स सेलर्स ॲन्ड एअरमेन्स बोर्ड | डिस्ट्रिक्ट सोल्जर्स सेलर्स ॲन्ड एअरमेन्स बोर्ड |
| नोव्हेंबर १९७५ | केंद्रीय सैनिक बोर्ड | राज्य सैनिक बोर्ड | जिल्हा सैनिक बोर्ड |
| नोव्हेंबर १९८३ | - | सैनिक कल्याण विभाग | जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय |

१.९.  राज्य सैनिक बोर्ड आणि जिल्हा सैनिक कल्याण कार्यालये शासकीय कार्यालये घोषित झाली: - दिनांक ०८ मार्च १९६६ रोजी महाराष्ट्र राज्याचे सोल्जर्स सेलर्स ॲन्ड एअरमेन्स बोर्ड आणि त्याचप्रमाणे १८ जिल्हयांचे सोल्जर्स सेलर्स ॲन्ड एअरमेन्स बोर्ड ही महाराष्ट्र शासनाची शासकीय कार्यालये घोषित करण्यात आली आणि या अनुषंगाने या कार्यालयातील सर्व कर्मचारी वर्गसुध्दा राज्य शासनाचे कर्मचारी म्हणून घोषित केले गेले. या नंतरच्या कालावधीत आजपर्यंत १२ नवीन जिल्हा सैनिक कल्याण कार्यालये व ३ जिल्हा सैनिक कल्याण कक्षांची निर्मिती झाली आहे. ही सर्व कार्यालये जरी राज्य शासनाची शासकीय कार्यालये म्हणून घोषित केली असली आणि त्यातील कर्मचारी वर्ग सुध्दा जरी राज्य शासनाचे कर्मचारी म्हणून घोषित केले असले तरी या कार्यालयांसाठी होणारा खर्च, तद्वतच कर्मचा-यांच्या पगारावर आणि अन्य भत्त्यांवर होणारा खर्च हा केंद्र शासनाकडून ६० टक्के आणि राज्य शासनाकडून ४० टक्के अशा पध्दतीने उचलला जातो.

१.१०.  माजी सैनिकांचे आणि त्यांच्या अवलंबितांचे कल्याण ही केंद्र शासनाची आणि राज्य शासनाची संयुक्त जबाबदारी आहे. तथापि, माजी सैनिकांच्या बहुतांश समस्यांचे समाधान राज्य शासनामार्फत केले जाते. माजी सैनिकांच्या कल्याणाचे काम करण्यासाठी आपल्या देशात एकंदर ३२ राज्य सैनिक मंडळे आहेत. ज्याप्रमाणे केंद्र शासनाला माजी सैनिकांच्या कल्याण विषयक सल्ला देण्यासाठी केंद्रीय सैनिक मंडळ अस्तित्वात आहे, त्याचप्रमाणे, राज्य आणि जिल्हा स्तरावर, राज्य सैनिक मंडळ आणि जिल्हा सैनिक मंडळ याचे गठण करण्यात आलेले असून त्यांची संरचना सल्लागार स्वरुपाची आहे. ही सल्लागार मंडळे जास्तीत जास्त विधायक कामे करण्याच्या दृष्टीने उपयुक्त आहेत. मात्र माजी सैनिकांचे कल्याण आणि पुनर्वसनाच्या सर्व योजना या फक्त राज्य

Department of Sainik ...

सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य आणि प्रत्येक जिल्हयाची जिल्हा सैनिक कल्याण कार्यालये यांच्या मार्फत राबविल्या जातात.

**माजी सैनिकांची व्याख्या**

२.१. माजी सैनिकांना दिल्या जाणाऱ्या सेवा/सवलती बाबतची माहिती घेण्यापुर्वी हे जाणून घेणे आवश्यक आहे की, माजी सैनिक कोणाला म्हणावयाचे? सामान्यत: माजी सैनिक म्हणजे सशस्त्र सेना दलाच्या तिन्ही दलापैकी (भूदल/वायुदल/नौदल) कोणत्याही एका दलात सेवा केलेला व्यक्ती अशी कल्पना जनसामान्यात आहे. परंतु नोकरी आणि अन्य सेवा सवलती देण्यासाठी भारत सरकारने माजी सैनिक या शब्दाची व्याख्या निश्चित केलेली आहे. यामध्ये वेळो-वेळी बदल झालेले आहेत. माजी सैनिकांच्या आजतागायत ९ निरनिराळया व्याख्या केलेल्या असून या व्याख्या मुख्यत्वेकरुन सैन्यसेवेतून मुक्त केल्याच्या दिनांकावर अवलंबून आहेत. या कारणामुळे एखाद्यी व्यक्ती माजी सैनिक आहे किंवा कसे याचा निकष त्या व्यक्तीच्या सैन्यसेवेतून मुक्त झालेल्या दिनांकावर अवलंबून आहे. कारण या दिनांकाप्रमाणे त्या व्यक्तीचा ९ व्याख्येपैकी कोणत्या एका व्याख्येत समावेश होतो हे तपासून पाहणे आवश्यक ठरते: -

- **०१ जुलै १९६६ पासून ३० जुन १९६८ या दरम्यान सैन्य सेवेतून मुक्त झालेल्या व्यक्ती**. :- अशा व्यक्ति ज्यांनी भारतीय संघ राज्याच्या सशस्त्र सेनादलात कोणत्याही हुद्यावर (सैनिक किंवा असैनिक) सेवा केलेली आहे आणि त्या सेवेतून मुक्त झालेले असावेत. परंतु ते गैरवर्तन किंवा अकार्यक्षमते मुळे सेवेतून बडतर्फ झालेले नसावेत.

- **०१ जुलै १९६८ पासून ३० जून १९७४ पुर्वी सैन्य सेवेतून मुक्त झालेल्या सैनिकांसाठी** :- अशा व्यक्ति ज्यांनी भारतीय संघ राज्याच्या सशस्त्र सेनादलात कोणत्याही हुद्यावर (सैनिक किंवा असैनिक) सलगपणे कमीत कमी सहा महीन्या पेक्षा जास्त सेवा करुन सेवेतून मुक्त झालेले असावेत. परंतु ते गैरवर्तन किंवा अकार्यक्षमते मुळे सेवेतून बडतर्फ झालेले नसावेत.
- **०१ जुलै १९७४ पासून ३० जून १९७९ पर्यंत सैन्य सेवेतून मुक्त झालेल्या सैनिकांसाठी** :-अशा व्यक्ति, ज्याने भारतीय संघ राज्याच्या सशस्त्र सेनादलात कोणत्याही हुद्यावर (सैनिक किंवा असैनिक ) शपथविधी नंतर सलगपणे कमीत कमी सहा महिने सेवेनंतर सेवा मुक्त झालेले आहेत.
- **०१ जुलै १९७९ पासून ३० जून १९८७ पर्यंत सैन्य सेवेतून मुक्त झालेल्या सैनिकांसाठी** :- अशा व्यक्ति, ज्याने भारतीय संघ राज्याच्या सशस्त्र सेनादलात कोणत्याही हुद्यावर (सैनिक किंवा असैनिक) शपथविधी नंतर सलगपणे कमीत कमी सहा महिने सेवा केली असेल आणि स्वेच्छा निवृत्तीच्या कारणाव्यतिरिक्त सेवा मुक्त केले असेल. जर स्वेच्छा निवृत्तीच्या कारणामुळे सेवा मुक्त

Department of Sainik Welfare

केले असल्यास कमीत कमी ५ वर्ष सेवा केलेली असली पाहिजे. परंतु ते गैरवर्तन किंवा अकार्यक्षमते मुळे सेवेतून बडतर्फ झालेले नसावेत.

- **०१ जुलै १९८७ व त्यानंतर सैन्य सेवेतून मुक्त झालेल्या सैनिकांसाठी :-** माजी सैनिक म्हणजे भारतीय संघ राज्याच्या सशस्त्र सेनादलात (भूदल, नौदल, वायुदल) कोणत्याही हुद्यावर (सैनिक किंवा असैनिक) सेवा केलेली आहे आणि जो/जी अशा सशस्त्र दलाच्या सेवेतून निवृत्तीवेतन घेवून सेवानिवृत्त झाला/झाली आहे अथवा जो /जी सशस्त्र सेनादलाच्या सेवेमुळे वैद्यकीय दृष्टीने अपात्र ठरुन सेवामुक्त झाला/झाली असेल व ज्याला/जिला वैद्यकीय निवृत्तीवेतन मिळत असेल किंवा सेवा कालावधीच्या शर्तीनुसार निर्धारित सेवा कालावधी पूर्ण करुन ज्यास सशस्त्र सेवा कालावधीचे सैन्यसेवा उपदान मिळालेले आहे असा, किंवा सशस्त्र दलातून अतिरिक्त (सरप्लस) म्हणून जाहीर करुन सेवामुक्त करण्यात आला असेल.

- **प्रादेशिक सेनेतील व्यक्ती.**

खाली नमूद केलेल्या प्रादेशिक सेनेतील व्यक्ती ज्या दि. १५.११.१९८६ किंवा त्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या आहेत अशा खालील नमूद अटी पूर्ण करत असलेल्याना माजी सैनिकांच्या व्याख्येत समाविष्ठ करण्यात आलेले आहे: -

(१) अखंड अंतर्भूत सेवेनुसार निवृत्ती वेतन धारक.
(२) ज्या व्यक्तींना वैद्यकीय निवृत्तीवेतन मिळत आहे..
(३) शौयपदक प्राप्त व्यक्ती.

- **आर्मी पोष्टल सर्विसमध्ये सेवा केलेल्या व्यक्ती.**

अशा व्यक्ती ज्यानी आर्मी पोष्टल सर्विस मध्ये सैन्याचा एक भाग म्हणून त्याच दलातून सेवा करुन सैन्य सेवा कालावधीच्या शर्तीनुसार निर्धारित सेवा कालावधी पूर्ण करुन निवृत्ती वेतन घेत असेल किंवा सैन्य सेवा करत असताना वैदयकीय कारणास्तव निवृत्तीवेतन घेऊन निवृत्त झाले आहेत. तसेचे दिनांक १४ एप्रिल १९८७ पूर्वी आर्मी पोष्टल सर्विसमध्ये सहा महीन्यापेक्षा जास्त वेळ प्रतिनियुक्तीवर होत्या अशा व्यक्तीना माजी सैनिकाचा दर्जास पात्र आहेत.

- **शॉर्ट सर्विस कमिशंड ऑफीसर** ज्यांच्या सेवेचा विहीत कालावधी ५ वर्षाचाच असतो. या ५ वर्षाच्या कालावधीनंतर ते सेवामुक्त झाले असतील तर ते माजी सैनिकाच्या दर्जास पात्र आहेत.

Department of Sainik Welfare • Ghorpadi, Pune

- **रिक्रुट**:-जे रिक्रुट सैन्य सेवेतून वैद्यकीय कारणास्तव बोर्ड आऊट/सैन्यसेवेतून मुक्त केलेले असतील व त्यांना वैद्यकीय/अपंगत्वाचे निवृत्तीवेतन मिळत असेल तर ते माजी सैनिकाच्या दर्जास पात्र आहेत.

(वरील सर्व वर्गीकरणामध्ये असे सैनिक ज्यांच्या **गैरवर्तनामुळे** किंवा अकार्यक्षमतेमुळे सशस्त्र सेनादलातील सेवा संपुष्टात आणण्यात आलेल्या आहेत किंवा सेवेतून **कमी** करण्यात आलेले आहे किंवा लढाऊ व्यक्ती बनण्यास अपात्र घोषित करुन सशस्त्र दलातून **कमी** करण्यात आले आहे अशा व्यक्ती माजी सैनिकाच्या व्याख्येत येत नाहीत.)

- **माजी सैनिकाच्या विविध व्याख्या आणि त्यांच्या अनुषंगाने नेहमी विचारले जाणारे प्रश्न** : माजी सैनिकांच्या व्याख्येबाबत सामान्यत: ज्या शंका उपस्थित केल्या जातात त्या शंकाचे निरसन निदेशक, पुनर्वसन (DGR) यांनी त्यांचे पत्र क्रमांक-४००८/DGR/S&R/Res-९ दिनांक १७ नोव्हेंबर १९९३ अन्वये केलेले असून याबाबतची माहिती विभागाची वेबसाईट www.mahasainik.gov.in वर देण्यात आलेली आहे.

## माजी सैनिक/माजी सैनिक विधवा यांना ओळखपत्र देणेबाबत

३.१. माजी सैनिक/विधवा यांना केंद्र/राज्य शासनाच्या सेवा/सवलती उपलब्ध करुन देण्या करिता माजी सैनिकाच्या व्याखेमध्ये बसत असलेल्या व्यक्तीस माजी सैनिकाचे ओळखपत्र तर सैनिक/माजी सैनिकाच्या मृत्युनंतर त्यांचे विधवा पत्नीस विधवांचे ओळखपत्र जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांमार्फत देण्यात येते.

३.२ माजी सैनिकाचा दर्जा ठरविताना सैन्यमुक्तीच्या तारखेच्या कालावधीत अस्तित्वात असलेली माजी सैनिकाची व्याख्या त्याचप्रमाणे सैन्यातून मुक्तीचे कारण, निवृत्तीवेतनधारक आहे किंवा कसे अशा अनेक बाबी विचारात घेतल्या जातात.

**टीप**:- काही माजी सैनिक नोकरीच्या निमित्ताने महाराष्ट्रात एका जिल्हयातून दुस-या जिल्हयात स्थलांतरीत होत असतात अशा वेळी ज्या जिल्हयातून ते स्थलांतरित होतात त्या जिल्हयांतील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाकडून घेतलेले माजी सैनिकाचे ओळखपत्र रद्द करण्यासाठी त्यांचेकडे जमा करुन ना हरकत प्रमाण पत्र घेणे आवश्यक आहे. यानंतर ते ज्या जिल्हयात स्थलांतरित होतात त्या जिल्हयातील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाकडे ना हरकत प्रमाण पत्र सादर करुन नवीन ओळखपत्र घेणे आवश्यक आहे. माजी सैनिकाकडे ज्या जिल्हयाचे ओळखपत्र

Department of Sainik Welfare

आहे केवळ त्याच जिल्हयात त्या माजी सैनिकाची सर्व कल्याण विषयक कामे, तसेच, आर्थिक मदतीचे अर्ज स्वीकारले जातात.

**माजी सैनिकांची नोकरीसाठी नोंदणी**

४.१. आरक्षण :- भारतीय सैन्यदलामध्ये अनेकजण वयाच्या १८ ते २१ वर्षे वयात प्रवेश करतात व सुमारे १५ ते २० वर्षे सेवा केल्यानंतर सेवानिवृत्त होतात. त्यावेळी त्यांचे वय सुमारे ३५ ते ४० वर्षाच्या दरम्यान असते. तारुण्यांच्या ऐन उमेदित देशाच्या रक्षणासाठी सेवा केल्यानंतर नागरी जीवनात स्थायिक होण्याकरीता महाराष्ट्र व केंद्र सरकार त्यांना सर्वतोपरी मदत करीत असते. अशा माजी सैनिकांना महाराष्ट्र शासनाच्या विविध खात्यात, महामंडळात व तत्सम संस्थात वर्ग ३ व वर्ग ४ मध्ये प्रत्येकी समांतर आरक्षणा अन्वये १५ टक्के जागा राखून ठेवल्या आहेत. तसेच केंद्र शासनाने आपल्या विविध खात्यात, महामंडळात व तत्सम संस्थात वर्ग ३ मध्ये १० टक्के व वर्ग ४ मध्ये २० टक्के जागा राखून ठेवल्या आहेत.

४.२. नोंदणी - राखीव जागांवर माजी सैनिकांना पुरस्कृत करण्यासाठी सेवा निवृती नंतर माजी सैनिकांचे ओळखपत्र दिल्यानंतर नोकरीसाठी पात्र माजी सैनिकांची नोंदणी रोजगार नोंदणी रजिस्टर मध्ये करण्यात येऊन त्या माजी सैनिकांस रोजगार नोंदणीचे कार्ड देण्यात येते.

४.३. नूतनीकरण-माजी सैनिकाने रोजगारासाठी नाव नोंदणी केल्यानंतर ती तीन वर्षासाठी वैध राहते. त्यानंतर माजी सैनिकांना या नोंदणीचे नूतणीकरण करणे गरजेचे आहे.

४.४. नोकरीसाठी नावे पुरस्कृत करणे: - केंद्र/राज्य शासनाच्या विविध कार्यालयांकडून माजी सैनिकांसाठी राखीव असलेल्या जागांवर भरती करतानां संबंधित जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांकडून माजी सैनिकांची यादी कमीत कमी १५ दिवस अगोदर प्राप्त करुन घेतली पाहिजे. त्याशिवाय जाहिरातीद्वारे, दूरदर्शन, रेडिओ, नोटीसबोर्ड व इतर माध्यमातून प्रसिध्दी देवून माजी सैनिकांचे अर्ज प्राप्त करुन घेतले पाहिजेत. जेणेकरुन कोणत्याही पात्र माजी सैनिकांवर अन्याय होणार नाही व दोन्हीही प्रकारच्या माजी सैनिकांना नोकरीच्या संधी उपलब्ध होतील. जर एखादा माजी सैनिक उमेदवार जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात नोंदणीकृत नसेल, किंवा काही कारणामुळे त्याचे नाव जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयामार्फत पाठविण्यात आलेल्या यादीत समाविष्ठ नसेल, तरी असा पात्र उमेदवार जाहिरातीच्या आधारावर संबंधीत कार्यालयाकडे सरळ अर्ज करु शकतो. संबंधित कार्यालयांकडून मागणी पत्र प्राप्त झाल्यानंतर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांच्या रोजगार पटावर नोंदणीकृत माजी सैनिक उमेदवारांमधून त्याच्या नोंदणीची जेष्ठता,

अर्हता आणि वयोमर्यादा याचा विचार करुन एक जागेसाठी पाच पात्र माजी सैनिकांची नावे पुरस्कृत केली जातात.

४.५. युध्दात/सैन्य सेवेत मृत्यु पावलेल्या किंवा अपंग झालेल्या सैनिकांच्या कुटुंबियास शासकीय सेवेत भरतीकरिता प्राधान्य: - शासन निर्णय दि. ०२ सप्टेंबर १९८३ नुसार सर्व प्रकारच्या कार्यालयांनी (१) माजी सैनिकांसाठी वर्ग ३ व वर्ग ४ मधील आरक्षित असलेल्या १५ टक्के पदांवर भरती करताना युध्द काळात किंवा युध्द नसताना सैन्यातील सेवेमुळे अपंग झालेल्या माजी सैनिकांना १५ टक्के राखीव पदांपैकी उपलब्ध पदांवर प्राथम क्रमाने तसेच सैनिकी सेवेत मृत झालेल्या किंवा अपंगत्व येऊन त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकांच्या कुटुंबातील फक्त एका व्यक्तीला त्या नंतरच्या पसंतीक्रमाने देणे बाबत तरतूद आहे.

सैनिक कल्याण विभाग व विभागाच्या अधिपत्याखालील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना/कार्यक्रम

५.१. पुनर्वसन महासंचालनालय, नवी दिल्ली यांच्या योजना.

(क) माजी सैनिकांना पुनर्वसन प्रशिक्षण:- माजी सैनिक व सैन्य सेवेत असताना मृत्यु झालेल्या सैनिकांच्या पत्नी अथवा एका पाल्याला पुनर्वसनासाठी मान्यता प्राप्त पाठयक्रमासाठी प्रशिक्षण व विद्यावेतन जिल्हा सैनिक कार्यालयांमार्फत देण्यात येते.

(ख) युध्दात वीरगती प्राप्त सैनिकांचे अवलंबित/मोहिमेत अपंगत्व प्राप्त सैनिक/शौर्यपदक विजेता यांना गॅस एजेन्शी, पेट्रोल पंप, रॉकेल एजेन्शी करिता ८% आरक्षित जागासाठी पात्रता प्रमाण पत्र पुनर्वसन महासंचालनालयाकडून देण्यात येतात.

५.२. केंद्रिय सैनिक मंडळ, नवी दिल्ली :- माजी सैनिक, त्यांचे कुटुंबिय व सेवेत असणाऱ्या सैनिकांचे कुटुंबिय यांची काळजी वाहणे व त्यांना आवश्यक असलेले सहाय्य देणे हे कल्याण विषयक कार्य केंद्रिय सैनिक मंडळाकडून पार पाडले जाते. केंद्रिय सैनिक मंडळामार्फत आर्मड फोर्सेस फ्लॅग डे फंड (AFFDF)/ आर्मी सेंट्रल वेलफेअर फंड (ACWF)/RMDF मधून देण्यात येणाऱ्या विविध सवलतीबाबत सैनिक कल्याण विभागाची वेबसाईट www.mahasainik.com वर सविस्तर माहिती उपलब्ध करण्यात आलेली आहे.

Department of Sainik Welfare
सत्यमेव जयते
Ghorpadi, Pune

५.३. राज्य शासनाच्या सवलती/योजना :- महाराष्ट्र शासनाने माजी सैनिकांसाठी ज्या योजना घोषित केल्या आहेत त्या योजनांचा लाभ हा केवळ महाराष्ट्र राज्याचे अधिवास असलेले माजी सैनिकांपुरत्याच मर्यादित आहेत. या कारणामुळे राज्य शासनाने घोषित केलेल्या सवलतीचा लाभ घेण्यासाठी अर्ज करतांना आवश्यक भासल्यास माजी सैनिकाच्या अधिनिवासाबाबतचे प्रमाणपत्र जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातर्फे मागितले जाते. शासन पत्र क्रमांक-सैकवि-१०००/२७२७/२८ दिनांक २४-११-२००० नुसार एखादा माजी सैनिक महाराष्ट्राचा अधिनिवासी आहे किंवा कसे हे ठरविण्यासाठी मुख्यत्वेकरुन पुढे नमूद केलेल्या दोन अटींची पडताळणी करण्यात येते :-

(क) माजी सैनिक सेवेत प्रवेश करण्याआधी मूलत: महाराष्ट्राचा रहिवाशी असला पाहिजे.

(ख) किंवा, माजी सैनिकाने सैन्यसेवेतून निवृत्त झाल्यानंतर किमान १५ वर्षे महाराष्ट्र राज्यात सलग वास्तव्य केलेले असणे आवश्यक आहे.

(ग) सैन्यामध्ये सेवेत असलेल्या कालावधीत माजी सैनिकाने जर महाराष्ट्र राज्यात नोकरी निमित्ताने निवास केला असेल तर अशा निवासाचा कालावधी हा माजी सैनिकाच्या अधिनिवासाच्या पात्रतेसाठी लक्षात घेतला जाऊ नये.

५.४. महाराष्ट्र राज्य सरकारमार्फत राबविण्यात येणा-या योजना. महाराष्ट्र शासन माजी सैनिकांच्या पुनर्वसन आणि कल्याणासाठी प्रामुख्याने सैनिक कल्याण विभागामार्फत पुढील योजना राबविते :-

(अ) युध्द किंवा युध्दजन्य मोहिमेत धारातीर्थी पडलेल्या जवानांच्या वारसांना/त्यांचे अवलंबितांना सानुग्रह अनुदान : महाराष्ट्रातील बलिदान केलेल्या किंवा अपंगत्व आलेल्या सैनिकांना किंवा त्यांच्या अवलंबितांना मानाने जगता यावे म्हणून महाराष्ट्र शासनातर्फे पुढील प्रमाणे सानुग्रह अनुदान देण्यात येते:-

(१) दिनांक ०१ जानेवारी २०१९ पासून युध्दात, युध्दजन्य परिस्थितीमध्ये तसेच देशातील सुरक्षा संबंधी मोहिमेत, चकमकीत देशाबाहेरील मोहिमेत धारातीर्थी पडलेल्या अधिकारी/जवान यांच्या अवलंबितांना ०१ कोटी रुपयांचे सानुग्रह अनुदान त्यातमधून वीरपत्नीस ६०%, वीरमाता २०% व वीरपित्यास २०% अनुदान विभागून दिले जाते.

Department of Sainik Welfare Ghorpadi, Pune सत्यमेव जयते

(२) दिनांक ०१ जानेवारी २०१९ पासून युध्दात, युध्दजन्य परिस्थितीमध्ये तसेच देशातील सुरक्षा संबंधी मोहिमेत, चकमकीत देशाबाहेरील मोहिमेत १% ते २५% व आल्यास रू. २० लाख, २६% ते ५०% अपंगत्व आल्यास रु. ३४ लाख आणि ५१ ते १००% अपंगत्व आल्यास रू. ६० लाख सानुग्रह अनुदान दिले जाते.

उपरोक्त अनुदानासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, लाभार्थी व संरक्षण दलाकडून कागदोपत्री पुरावा मागवून प्रकरण सैनिक कल्याण विभागामार्फत शासनास मंजूरी करिता सादर करतात.

(ब) महाराष्ट्र गौरव पुरस्कार योजना: सैन्य सेवेत असताना ज्या सैनिक / अधिका-यांना शौर्यासाठी पदके / पुरस्कार मिळाले त्यांच्यासाठी महाराष्ट्र शासनाने गौरव पुरस्कार सुरु केले आहेत. या योजने अंतर्गत परमवीर चक्र, महावीर चक्र, इ. शौर्यपुरस्कार मिळविणा-या तसेच उत्कृष्ठ सेवा बजावणा-या (परमविशिष्ट आणि विशिष्ट सेवा पदके मिळविणारे) सैनिकांना शौर्यपदक/सेवा पदकानुसार रु. ५०,००० ते रु. ६०,००,०००/- पर्यंत रोख रक्कम देवून गौरवण्यात येते. धारातीर्थी पडलेल्या ज्या सैनिकांना मरणोपरांत पदक बहाल झालेले आहेत अशा शहीद सैनिकांच्या वारसांना दरमहा रु.२५००/- ते ३३,०००/- पर्यन्त रक्क्म त्यांचे पुरस्कारानुसार निवृत्तीवेतन (सानुग्रह अनुदान) देय आहे.

**क)** भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र: महाराष्ट्रातून जास्तीत जास्त युवक सैन्यदलात अधिकारी / जवान म्हणून भरती व्हावेत यासाठी सैन्य दलाच्या भरती कार्यक्रमानुसार संबंधित जिल्हयामध्ये सैनिक कल्याण विभागातर्फे पात्र तरुणांसाठी १५ दिवसांची विनामुल्य भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्रे चालविली जातात. त्याचप्रमाणे नाशिक येथे अधिका-यांच्या भरतीसाठी प्रशिक्षण केंद्रे चालविण्यात येतात.

ड) दुसरे महायुध्द अनुदान: ज्या माजी सैनिकांनी दुस-या महायुध्दात ( सन १९३९ ते १९४५) मध्ये भाग घेतला व ज्यांना इतर कोणतेही निवृत्ती वेतन मिळत नाही अशा माजी सैनिकांना अथवा त्यांच्या विधवांना दरमहा रु. ६०००/- प्रमाणे अनुदान दिले जाते.

उपरोक्त योजना व्यतिरिक्त शासकीय सेवेमध्ये वर्ग ३ आणि ४ च्या पदांसाठी १५ टक्के समांतर आरक्षण, पाल्यांसाठी शैक्षणिक सवलत, जमिन, निवाशी प्लॉटस्, गृहनिर्माण योजना, बंदुकीचा परवाना, स्वस्त धान्य दुकान/रॉकेल विक्रीचा परवाना यामध्ये माजी सैनिकांना सवलती/प्राधान्य देण्यात आलेले आहे.

Department of Sainik Welfare * Ghorpadi, Pune * सत्यमेव जयते

५.५ सैनिक कल्याण विभागाच्या कल्याणकारी निधी/विशेष निधीमधून राबविल्या जाणा-या योजना :- सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाद्वारे संपूर्ण महाराष्ट्रात गोळा करण्यात येणारा निधी ध्वजदिन निधी म्हणून ओळखला जातो. या निधीचा ६० टक्के हिस्सा कल्याणकारी निधी मध्ये तर ४० टक्के हिस्सा विशेष निधीमध्ये वर्ग केला जातो. कल्याणकारी निधीचे व्यवस्थापन मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील राज्य सैनिक मंडळ व त्यास सहाय्य करण्यासाठी मा. मंत्री, माजी सैनिक कल्याण यांच्या अध्यक्षतेखालील राज्य सैनिक मंडळाची कार्यकारी समिती पाहते. त्याच प्रमाणे विशेष निधीचे व्यवस्थापन मा. राज्यपाल यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या विशेष निधी (महाराष्ट्र) राज्य व्यवस्थापकीय समिती करीत असते. कल्याणकारी निधीमधून राबविण्यात येणाऱ्या योजनाबाबतची माहिती विभागाची वेबसाईट www.mahasainik.gov.in वर देण्यात आलेली आहे. विशेष निधीमधून मुख्यत्वे करुन माजी सैनिकांसाठी बांधण्यात आलेली ३० विश्रामगृहे/माजी सैनिकांच्या मुलां/मुलींसाठी बांधण्यात आलेल्या एकूण ४९ वसतिगृहांच्यावर होणारा खर्च भागविला जातो. ज्या माजी सैनिकांच्या मुलांना वसतिगृहामध्ये दाखला मिळालेला नाही अशा मुलांना वसतिगृह खर्चाची प्रतिपुती म्हणून दर महा ८००/- किंवा वार्षिक ८०००/- इतकी रक्कम अदा करण्यात येते. महाराष्ट्रातील विश्रामगृहे व वसतिगृहांची माहिती विभागाच्या वेबसाईटवर जिल्हास्तरिय माहितीमध्ये देण्यात आलेली आहे.

५.६ छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक महाराष्ट्र राज्यामधील सैन्यामध्ये असणा-या अधिकारी वर्गाची संख्या अत्यंत अल्प प्रमाणात आहे. राज्यातील तरुणांना कम्बाईन्ड डिफेस सर्विसेस द्वारे सैन्यदलात अधिकारी म्हणून भरती करण्याच्या उद्देशाने प्रशिक्षणार्थीना लेखी परीक्षासाठी ३ महिन्याचा तर साक्षात्कारासाठी १० दिवसाचे विनामुल्य प्रशिक्षण छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्राद्वारे दिले जाते.

संगणकीकरण

६.१ राज्यातील माजी सैनिकांच्या विविध कामाविषयी आणि राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या अनेक योजनाविषयीच्या कामत शिघ्रता, सुसूत्रता, अचुकता यामध्ये वृध्दी करुन या समग्र कामांची कार्यक्षमता वाढविणेकामी सैनिक कल्याण विभाग आणि जिल्हास्तरावरील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांकडे संगणकांची उपलब्धता करुन देणे ही सध्याच्या काळाची अनिवार्य गरज विचारात घेऊन सन २००१ मध्ये सर्व जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांस संगणक पुरविण्यात आलेले असून कार्यालयाच्या कामाचे संगणकीकरण ऑक्टोबर २००३ मध्ये पुर्ण करण्यात आले आहे.

Department of Sainik Welfare * Ghorpadi, Pune * सत्यमेव जयते

## नागरिकांची सनद

### सैनिक कल्याण विभाग/जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांकडून पुरविल्या जाणा-या सेवा/सवलती/आर्थिक मदती यासाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे, कालावधी, सेवापुरविणारा अधिकारी इत्यादी

| अ. क्र | सेवांचा तपशील | आवश्यक कागदपत्रे | आवश्यक कागदपत्राची पुर्तता केल्यानंतर सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी यांचे नांव, हुद्दा व कार्यालय, | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्याच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्याचे दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | चरितार्थासाठी आर्थिक मदत | १.डी. डी. ४० सर्व माहितीसह<br>२.ओळखपत्राची छायांकित प्रत<br>३.कल्याण संघटकाकडून अर्जदाराच्या उत्पन्नाचा आढावा. | ७ दिवस, | जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी / जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय | उपसंचालक (पुनर्वसन), सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे, दुरध्वनी - ०२०/७१००२६२९ |
| २ | सेवारत सैनिक दिवंगत झाल्यास एकरकमी आर्थिक मदत | १) लाभार्थीचा सविस्तर वैयक्तीक अर्ज<br>२) डी. डी. ४० सर्व माहितीसह.<br>३) ओळखपत्राची छायांकित प्रत<br>४) Physical Casuality असल्याबाबतचा सैनिकाच्या अभिलेख कार्यालयाकडून कागदोपत्री पुरावा<br>५) Physical Casuality झालेल्या सैनिकांच्या वारसाची संपूर्ण माहिती पूर्ण नांव, पत्ता आणि ते दिवंगत सैनिकाचे वारस असल्याचा कायदेशीर पुरावा.<br>६) जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाची शिफारस<br>७) सैनिकाच्या अपंगत्वाबददल अंतिम मेडिकल बोर्डाची साक्षांकित प्रत | ७ दिवस | जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी / जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय | वरील प्रमाणे |
| ३ | सेवारत सैनिकास अपंगत्व आल्यास | | ३० दिवस | उपसंचालक (पुनर्वसन), सैनिक कल्याण विभाग महाराष्ट्र राज्य, पुणे दुरध्वनी ०२०/७१००२६२९ | संचालक, सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे, दुरध्वनी - ०२०/७१००२६०१, २०/७१००२६०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | मुलीच्या लग्नासाठी | १) लाभार्थीचा सविस्तर वैयक्तीक अर्ज<br>२) डी. डी. ४० सर्व माहितीसह<br>३) ओळखपत्राची छायांकित<br>४) लग्न पत्रिका व लग्न झाल्याबाबतचा ग्रामपंचायतीचा / विवाह नोंदणीचा दाखला<br>५) मुलीच्या जन्म तारखेचा दाखला<br>६) विवाह नोंदणी दाखला. | ७ दिवस | जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी / जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय | उपसंचालक (पुनर्वसन), सैनिक कल्याण विभाग महाराष्ट्र राज्य, पुणे दुरध्वनी - ०२०/७१००२६२९ |
| ५ | शौर्य पदक धारकांना एस.टी.खर्चासाठी | १) लाभार्थीचा सविस्तर अर्ज<br>२) डी.डी. ४० सर्व माहितीसह<br>३) ओळखपत्राची छायांकित प्रत<br>४) माजी सैनिकाच्या डिस्चार्ज पुस्तकाची साक्षांकित प्रती | ७ दिवस | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे |
| ६ | असाधारण अडचणीच्या वेळेस तातडीची मदत | १) लाभार्थीचा सविस्तर वैयक्तीक अर्ज<br>२) डी. डी. ४० सर्व माहितीसह<br>३) ओळखपत्राची छायांकित प्रत | ७ दिवस /३० दिवस | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे |
| **वैद्यकीय आर्थिक मदत** | | | | | |
| ७ | श्रवण यंत्र खरेदीसाठी | १) लाभार्थीचा अर्ज<br>२) डी.डी. ४० सर्व माहितीसह<br>३) औळखपत्राची छायांकित प्रत<br>४)डॉक्टराकडून कान तपासणीच्या कागदपत्रांची मूळ प्रत<br>५) श्रवण यंत्र खरेदीचे मूळ बिल | ७ दिवस | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे |
| ८ | दाताची कवळीसाठी | १) लाभार्थीचा अर्ज<br>२) डी.डी. ४० सर्व माहितीसह<br>३) औळखपत्राची छायांकित प्रत<br>४) डॉक्टराकडून दात तपासणीच्या कागदपत्रांची मूळ प्रत<br>५) दात कवळी खरेदीचे मूळ बिल | ७ दिवस | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९ | तिनचाकी/व्हील खुर्चीसाठी | १) लाभार्थीचा अर्ज<br>२) डी.डी. ४० सर्व माहितीसह<br>३) औळखपत्राची छायांकित प्रत<br>४) संबंधित वैद्यकीय उपकरणांची आवश्यकता असल्याचा डॉक्टरांचा दाखला<br>५) उपकरण खरेदीचे मूळ बिल | ३० दिवस | उपसंचालक (पुनर्वसन), सैनिक कल्याण विभाग महाराष्ट्र राज्य, पुणे दुरध्वनी-०२०/७१००२७६३ ०२०/७१००२६२९ | संचालक, सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे, दुरध्वनी ०२०/७१००२६०१ |
| १० | मतिमंद/ ५० % अपंग पाल्यांना औषधोपचार , शालेय शिक्षण , कौशल्य वाढविण्याच्या प्रशिक्षणासाठी आणि स्वयंरोजगारासाठी | १) लाभार्थीचा वैयक्तिक अर्ज<br>२) डी.डी. ४० सर्व माहितीसह<br>३) ओळखपत्राची झेरॉक्स प्रत<br>४) पाल्य मतिमंद/अपंग असल्याबाबतचे जिल्हा शल्य चिकित्सक यांचे प्रमाणपत्र.<br>५) पाल्य माजी सैनिकावर अवलंबून असल्याचे (Affidavit) आणि कल्याण संघटकाचा अहवाल. | ७ दिवस | जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी / जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय | उपसंचालक (पुनर्वसन), सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य , पुणे. दुरध्वनी - ०२०/७१००२६०५, ०२०/७१००२६२९ |
| ११ | अपंगाना कुबडी व इतर वैदयकीय उपकरणे खरेदीसाठी | १) लाभार्थीचा अर्ज २) डी.डी. ४० सर्व माहितीसह ३) औळखपत्राची छायांकित प्रत ४) संबंधित वैद्यकीय उपकरणांची आवश्यकता असल्याचा डॉक्टरांचा दाखला ५) उपकरण खरेदीचे मूळ बिल | ७ दिवस | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे |
| १२ | गंभीर शास्त्रक्रियेनंतर देखाभालीसाठी | १) लाभार्थीचा अर्ज २) डी.डी. ४० सर्व माहितीसह ३) औळखपत्राची छायांकित प्रत ४) शस्त्रक्रिया झाल्यानंतर पुढील देखभालीची आवश्यकता असल्याचे संबंधित डॉक्टरचे प्रमाणपत्र | ७ दिवस | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे |
| १३ | ६५ टक्के किंवा जास्त अंधत्व आलेल्या माजी सैनिक /विधवा यांना आर्थिक मदत | १) लाभार्थीचा सविस्तर अर्ज २) डी.डी. ४० सर्व माहितीसह<br>३) ओळखपत्राची छायांकित प्रत ४) ६५ % किंवा जास्त अंधत्व असल्याबाबतचा जिल्हा शल्य चिकित्सक यांचा दाखला | ७ दिवस | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे |

Department of Sainik Welfare • Ghorpadi, Pune • सत्यमेव जयते

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १४ | डोळयाचे मोती बिंदु (Cataract) ऑपरेशनसाठी | १) लाभार्थीचा वैयक्तीक अर्ज २) डी.डी. ४० सर्व माहितीसह<br>३) ओळखपत्राची छायांकीत प्रत ४) डॉक्टरांचे प्रमाणपत्र<br>५) ऑषधोपचाराची मूळ बीले , डॉक्टरच्या सही शिक्यासह<br>६) हॉस्पिटलचे मूळ बील | ७ दिवस | जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी / जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय | उपसंचालक (पुनर्वसन), सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य , पुणे. दुरध्वनी : ०२०/७१००२६०५, ०२०/७१००२६२९ |
| १५ | पॅराप्लेजीक सेंटर, पुणे , येथील अपंग माजी सैनिकांना | १) लाभार्थीचा सविस्तर अर्ज<br>ब) डी.डी. ४० सर्व माहितीसह<br>२) ओळखपत्राची छायांकीत प्रत<br>३) माजी सैनिकच्या अपंगत्वाचे प्रमाणपत्र<br>४) माजी सैनिक पॅराप्लेजीक सेंटर, खडकी,पुणे येथे रहात असल्याबाबतचे पॅराप्लेजीक सेंटर , पुणे यांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.<br>५) माजी सैनिक कोणत्याही जिल्हयाचा असला तरी सदर आर्थिक मदत ही जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, पुणे यांचे मार्फत देण्यात येईल व कल्याण संघटक , पुणे जिल्हा हे दर महिन्याच्या १० तारखेपर्यंत स्वत: तेथे जाऊन कागदपत्रांची पूर्तता करुन घेतील व रक्कम अदा करतील. | ७ दिवस | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे |
| **शेक्षणिक आर्थिक मदत** | | | | | |
| १६ | शालेय शिक्षणासाठी | १) लाभार्थीचा सविस्तर अर्ज २) डी.डी. ४० सर्व माहितीसह<br>३) ओळखपत्राची छायांकित प्रत ४) पाल्य शाळेत शिकत असल्याचा दाखला<br>५) फी भरल्याच्या, पुस्तके/वहया/गणवेश खरेदी केल्याच्या मूळ पावत्या. | ७ दिवस | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे |

Department of Sainik Welfare * Ghorpadi, Pune * सत्यमेव जयते

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १७ | महाविद्यालयीन शिक्षण | १) लाभार्थीचा सविस्तर वैयक्तिक अर्ज<br>२) डी.डी ४० सर्व माहितीसह<br>३) ओळखपत्राची छायांकित प्रत<br>४) शिक्षण संस्था विना अनुदानित असल्याचा दाखला<br>५) पाल्य शिक्षण संस्थेत कोणत्या वर्गात शिकत आहे याचा दाखल<br>६) शुल्क भरल्याच्या मूळ पावत्या<br>७)अनुदानीत सरकारमान्य शिक्षण संस्थेत त्याच अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणा-याशैक्षणिक शुल्काचा दाखला | ७ दिवस | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे |
| १८ | व्यावसायिक शिक्षण(विनाअनुदानित) | १) लाभार्थीचा सविस्तर वैयक्तिक अर्ज<br>२) डी.डी ४० सर्व माहितीसह<br>३)ओळखपत्राची छायांकित प्रत<br>४) विनाअनुदानित सरकारमान्य शिक्षण संस्थेत शिक्षण घेत असल्याचा दाखला<br>५) MBBS, BDS व BE अभ्यासक्रम सोडून बाकी अभ्यासक्रम शासनाने ठरवून दिलेल्या शुल्काविषयीचा संबंधित महाविद्यालयाचा दाखला .<br>६) शुल्क भरल्याच्या मूळ पावत्या<br>७) मागील वर्षाचा अभ्यासक्रम उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र | ७ दिवस | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे |
| १९ | व्यावसायिक शिक्षण(अनुदानित ) | १. लाभार्थीचा सविस्तर वैयक्तीक अर्ज<br>२) डी.डी. ४० सर्व माहितीसह<br>३)ओळखपत्राची छायांकीत प्रत<br>४)शासकीय /अनुदानित महाविद्यालयात शिक्षण घेत असल्याबाबत दाखला<br>५)शासकीय /अनुदानित महाविद्यालयात शुल्क भरलेल्या मूळ पावत्या.<br>६) शासकीय /अनुदानित महाविद्यालयाकडून /शासनाकडून संबंधित पाल्यास शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती मिळत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र ७) मागिल वर्षी पास झाल्याबाबतचे गुणपत्रिकेची छायांकित प्रत.<br>८) अनुदानित शिक्षण संस्थेत शासनाने ठरवून दिलेल्या शुल्काबाबत दाखला | ७ दिवस | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे |

Department of Sainik Welfare • Ghorpadi, Pune •

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २० | शिष्यवृत्ती (पाल्यांना) | १) लाभार्थीचा अर्ज.<br>२) डी.डी. ४० सर्व माहितीसह.<br>३) ओळखपत्राची छायांकित प्रत.<br>५) सध्या पाल्य ज्या वर्गात शिकत आहे त्या वर्गाचे बोनाफाईड सर्टिफिकेट.<br>६) उर्तीण झालेल्या वर्गाच्या गुणपत्रीकेची प्रमाणित सत्य प्रत . | अर्ज स्विकारण्याच्या अंतिम घोषित दिनांकापासून एक महिना | जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी / जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय | उपसंचालक (पुनर्वसन), सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य , पुणे. दुरध्वनी :- ०२०/७१००२६०५, ०२०/७१००२६४६ |
| २१ | परदेश शिक्षणासाठी | १) लाभार्थीचा सविस्तर वैयक्तिक अर्ज<br>२) डी.डी ४० सर्व माहितीसह<br>३) ओळखपत्राची छायांकित प्रत<br>४) ज्या अभ्यासक्रमासाठी पाल्य परदेशात शिक्षण घेण्यासाठी जात आहे त्या शिक्षण संस्थेमध्ये प्रवेश मिळाल्याचे प्रमाणपत्र<br>४) पाल्याने ज्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला आहे त्या अभ्यासक्रमाच्या पूर्ततेनंतरडिप्लोमा/पदवी/ पदव्युत्तर प्रमाणपत्र/डॉक्टरेट प्रदान होत असल्याबाबतचे परदेशतल्या संबंधित संस्थेचे प्रवेश घेतेवेळचे /त्याआधीचे प्रमाणपत्र .<br>५) व्हिसा ची छायांकित प्रत<br>६) पासपोर्टची छायांकित प्रत<br>७) पाल्य परदेशात शिक्षणासाठी Employer तर्फे Sponser झालेला नाही याबाबत अर्जदाराचे हमीपत्र (Undertaking) आवश्यक आहे. | ३० दिवस | उपसंचालक (पुनर्वसन), सैनिक कल्याण विभाग महाराष्ट्र राज्य , पुणे दुरध्वनी :- ०२०/७१००२७६३, ०२०/७१००२६२९ | संचालक, सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे, दुरध्वनी ०२०/७१००२६०१ ०२०/७१००२६०० |
| २२ | अन्य राज्यात शिक्षणासाठी | १) लाभार्थीचा सविस्तर वैयक्तिक अर्ज<br>२) डी.डी ४० सर्व माहितीसह<br>३)ओळखपत्राची छायांकित प्रत,<br>४)ज्या अभ्यासक्रमासाठी पाल्य महाराष्ट्राबाहेर शिक्षण घेण्यासाठी जात आहे त्या शिक्षण संस्थेमध्ये प्रवेश मिळाल्याचे प्रमाणपत्र व शिकत असल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडावे<br>५) शुल्क भरल्याच्या मूळ पावत्या.<br>६) अभ्यासक्रमाच्या कालावधी बाबतचा शिक्षणसंस्थेचा दाखला. | ७ दिवस | जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी / जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय | उपसंचालक (पुनर्वसन), सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य , पुणे. दुरध्वनी : ०२०/७१००२६०५, ०२०/७१००२६२९ |

Department of Sainik Welfare * Ghorpadi, Pune * सत्यमेव जयते

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २३ | सेवापूर्व प्रशिक्षणासाठी (NDA , IMA OTA व तत्सम संस्थेमध्ये प्रवेश घेतलेल्या पाल्याना, PCTC Nasik येथे व खाजगी संस्थेमध्ये स्पर्धात्मक परिक्षा प्रशिक्षण घेणाऱ्या पाल्याना | १) लाभार्थिचा अर्ज<br>२) डी.डी. ४० सर्व माहितीसह<br>३) ओळखपत्राची छायांकित प्रत<br>४) पाल्य स्पर्धा परीक्षेचे प्रशिक्षण घेत असल्याचा /सेवापूर्व संस्था, औरंगाबाद येथे प्रशिक्षण घेत असल्याचा दाखला.<br>५) शुल्क भरल्याच्या मूळ पावत्या | ७ दिवस / ३० दिवस | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे |
| २४ | विशेष पुरस्कार (राष्ट्रीय / अंतरराष्ट्रीय पातळीवर बहुमोल कामगीरी करणाऱ्या माजी सैनिक/पत्नी / पाल्य यांना तसेच इ. १० वी व १२ वी बोर्डाच्या परिक्षेमध्ये ९० % पेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या पाल्याना ) | १)लाभार्थीचा अर्ज<br>२) डी.डी. ४० सर्व माहितीसह<br>३) ओळखपत्राची छायांकित प्रत<br>४) ४) कोणती विशेष कामगिरी केली या बाबतचा पुरावा.<br>५) विद्यापीठात प्रथम क्रमांकाने उत्तिर्ण झाल्याचे विद्यापीठाचे प्रमाणपत्र<br>६) बोर्डात गुणवत्ता यादीत आल्याचे बोर्डाचे/ विद्यापिठाचे प्रमाणपत्र | समितीची तारीख निश्चित होऊन समितीने दिलेल्या निर्णयानुसार ३० दिवसात | उपसंचालक (पुनर्वसन), सैनिक कल्याण विभाग महाराष्ट्र राज्य , पुणे<br>दुरध्वनी :- ०२०/७१००२६०५<br>०२०/७१००२६२९ | संचालक, सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे, दुरध्वनी ०२०/७१००२६०१<br>०२०/७१००२६०० |

Department of Sainik Welfare • Ghorpadi, Pune • सत्यमेव जयते

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २५ | पाल्यांना संगणक प्रशिक्षण | १) लाभार्थीचा अर्ज<br>२) डी. डी. ४० सर्व माहितीसह<br>३) ओळखपत्राची छायांकित प्रत<br>४) अभ्यासक्रमाचा कालावधी बाबतचा संस्थेचा दाखला .<br>५) शुल्क भरल्याच्या मूळ पावत्या.<br>६) सदर प्रशिक्षण (कोर्स) ज्या संस्थेत घेतला आहे ती संस्था रजिस्टर्ड तसेच शासनमान्य असल्याचे प्रमाणपत्र.<br>७) ज्या संगणक कोससाठी प्रतपुर्तीची मागणी केलेली आहेत्या कोर्सचा प्रत्येक दिवसाच्या प्रशिक्षणाचा कालावधी दरदिवशी कमीतकमी **चार घडयाळी तासांचा (२४० मिनीटांचा** )असल्याबाबतचे संबंधित संस्थचे प्रमाणपत्र. | ७ दिवस | जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी / जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय | उपसंचालक (पुनर्वसन), सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य , पुणे.<br>दुरध्वनी :-<br>०२०/७१००२६०५,<br>०२०/७१००२६२९ |
| २६ | सैनिकी शाळेच्या खर्चासाठी | १) लाभार्थीचा अर्ज<br>२) डी.डी. ४० सर्व माहितीसह<br>३) ओळखपत्राची छायांकित प्रत<br>४) शाळेत शिकत असल्या बाबतचे सैनिकी शाळेचे प्रमाणपत्र<br>५) शुल्क भरल्याच्या मूळ पावत्या शैक्षणिक वर्षा प्रमाणे | ३० दिवस | उपसंचालक (पुनर्वसन), सैनिक कल्याण विभाग महाराष्ट्र राज्य , पुणे<br>दुरध्वनी -<br>०२०/७१००२६०५<br>०२०/७१००२६२९ | संचालक, सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे,<br>दुरध्वनी -<br>०२०/७१००२६०१ |
| **पुनर्वसनासाठी आर्थिक मदत** | | | | | |
| २७ | स्वयंरोजगार प्रशिक्षणासाठी | १) लाभार्थीचा अर्ज<br>२) डी.डी. ४० सर्व माहितीसह<br>३) कोणते प्रशिक्षण घेत आहात या बाबतचे संस्थेचे पत्र/दाखला<br>४) प्रशिक्षणाचे शुल्क भरल्याची मूळ पावती<br>५)ओळखपत्राची छायांकित प्रत | ७ दिवस | जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी / जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय | उपसंचालक (पुनर्वसन), सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य , पुणे.<br>दुरध्वनी :-<br>०२०/७१००२६०५,<br>०२०/७१००२६२९ |

Department of Sainik Welfare * Ghorpadi, Pune *

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २८ | स्वंरोजगारासाठी | १) लाभार्थीचा अर्ज<br>२) डी.डी. ४० सर्व माहितीसह<br>३) स्वयंरोजगारासाठी कर्ज घेतल्याचा बँकेचा/वित्त संस्थेचा दाखला (यात कोणत्या स्वयंरोजगारासाठी किती कर्ज दिले,सदर कर्जावर अन्य सवलत/सबसिडी/अनुदान मिळाले असल्यास त्याचा उल्लेख , कर्ज खाते क्रमांक,परत फेडीचे हप्ते किती व कसे आहेत, सदर स्वयंरोजगारासाठी माजी सैनिकांचे/विधवेचे अंशदान किती याचाही उल्लेख असावा.)<br>४) माजी सैनिक/अवलंबित कोणतीही नोकरी करत नसल्याचा सरपंचाचा/नगरसेवकाचा दाखला. बँकेशी केलेल्या कराराची छायांकित प्रत. हयात माजी सैनिकाच्या पत्नीच्या नांवे कर्ज घेतले असल्यास ते या योजनेस पात्र नाहीत.<br>६) ओळखपत्राची छायांकित प्रत.<br>७) ज्या बँकेकडून कर्ज घेतलेले आहे त्यांचेकडून व्याजाच्या परत फेडीबाबत प्रमाणपत्र आवश्यक आहे.<br>८) व्याजाची सूट या सदराखाली माजी सैनिकाने ज्या वित्तीय वर्षासाठी कर्जाची फेड केली आहे. त्याच वर्षासाठी अनुदान देय राहील. या बाबत बँकेचे प्रमाणपत्र (व्याजाची फेड केलेल्या रकमेच्या आकडयासह )आवश्यक आहे. | ३० दिवस | उपसंचालक (पुनर्वसन), सैनिक कल्याण विभाग महाराष्ट्र राज्य , पुणे<br>दुरध्वनी<br>०२०/७१००२६०५<br>०२०/७१००२६२९ | संचालक, सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे,<br>दुरध्वनी -<br>०२०/७१००२६०१<br>०२०/७१००२६०० |
| २९ | युध्दविधवांना घरकुलासाठी / Physical Casualty झालेल्या विधवांना घरकुलासाठी | १) लाभार्थीचा सविस्तर अर्ज<br>२) डी.डी. ४० सर्व माहितीसह<br>३) ओळखपत्राची छायांकित प्रत<br>४) स्वत:च्या नांवावर भूखंड /सदनिका असलेचा ग्रामंपचांयतीचा दाखला<br>५) घरबांधणीसाठी ग्रांमपंचायतीची परवानगी घेतल्याचा दाखला<br>६) घराच्या खचाचे अंदाजपत्रक व नकाशा<br>७) युध्दात/मोहिमेत/फिजिकल कॅज्युएलटी मध्ये पती दिवंगत झाल्याबाबतच्या संबधित अभिलेख कार्यालयाच्या पत्राची साक्षांकित प्रत | ३० दिवस | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३० | माजी सैनिकांना घरबांधणीसाठी | १) लाभार्थीचा सविस्तर अर्ज<br>२) डी.डी. ४० सर्व माहितीसह<br>३) ओळखपत्राची छायांकित प्रत<br>४) कर्ज घेतलेल्या बँकेचा/वित्त संस्थेचा दाखला<br>५) घर/भूखंड स्वत: च्या अथवा पत्नीच्या नांवावर असल्याचा ग्रामपंचायत /नगर पालीका / महानगरपालीका इ. चा दाखला<br>६) ग्रामपंचायत/नगरपालीका/महानगरपालीक इ. चा बांधकामास परवानगी असल्याचा दाखला<br>७) घराचा नकाशा, अंदाजपत्राक, करारनामा असणे आवश्यक.<br>८) बांधकाम पुर्णत्वाचा दाखला व ताबा प्रमाणपत्र. | ३० दिवस | उपसंचालक (पुनर्वसन), सैनिक कल्याण विभाग महाराष्ट्र राज्य , पुणे दुरध्वनी ०२०/७१००२६०५<br><br>०२०/७१००२६२९ | संचालक, सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे, दुरध्वनी - ०२०/७१००२६०१ |
| ३१ | ६५ % अपंग माजी सैनिकांना घर दुरुस्तीसाठी | १) लाभार्थीचा सविस्तर अर्ज<br>२) डी.डी. ४० सर्व माहितीसह<br>३) ओळखपत्राची छायांकित प्रत<br>४) ६५ % किंवा जास्त अपंगत्व असल्याबाबतचा जिल्हा शल्य चिकित्सक यांचा दाखला<br>५) अपंगत्व सुसहय करण्यासाठी आवश्यक घराची दुरुस्ती/घरात बदल करण्यासाठी संबंधित ग्रामपंचायत/नगरपालिका/महानगरपालिका यांची परवानगी<br>६) घर माजी सैनिकाचे नांवावर असल्याबाबतचा पुरावा | ३० दिवस | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे |
| ३२ | पाल्यांना वाहन प्रशिक्षणासाठी | १) लाभार्थीचा अर्ज<br>२) डी.डी. ४० सर्व माहितीसह<br>३) ओळखपत्राची छायांकित प्रत<br>४) पाल्य कोणते प्रशिक्षण घत आहे याबाबतचे संस्थेचे प्रमाणपत्र /दाखला<br>५) प्रशिक्षणाचे शुल्क भरल्याची मूळ पावती | ७ दिवस | जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी / जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय | उपसंचालक (पुनर्वसन), सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य , पुणे. दुरध्वनी :- ०२०/७१००२६०५, ०२०/७१००२६२९ |

Department of Sainik Welfare • Ghorpadi, Pune • सत्यमेव जयते

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३३ | माजी सैनिक पत्नी/विधवा यांचे महिला बचत गटांना स्वयंरोजगारा साठी आर्थिक मदत | **माजी सैनिक पत्नी/विधवा यांचे महिला बचत गटांना आर्थिक मदतीसाठी आवश्यक कागदपत्रे :-**<br>(१) लाभार्थीचा अर्ज<br>(२) माजी सैनिक / विधवा यांच्या ओळखपत्राची छायांकित प्रत.<br>(३) जि.सै.क.का.येथे उपलब्ध असलेल्या डी.डी.४० फॉर्म माहितीसह भरणे आवश्यक आहे.<br>(४) वित्तसंस्थेत/बँकेत सादर केलेल्या प्रकल्प अहवाल ची (Project Report)साक्षांकित प्रत.<br>(५) प्रकल्पास महाराष्ट्र शासनाची मान्यता असल्याबाबतच्या कागदपत्राची साक्षांकित प्रत.<br>**बचत गटाने कर्ज घेतलेल्या बँकेचा/वित्त संस्थेचा दाखला ज्यात खालील गोष्टींचा समावेश असणे आवश्यक आहे :-**<br>(अ) बचत गटास कोणत्या प्रकल्पा अंतर्गत कर्ज देण्यातआले आहेत्या प्रकल्पाचे नांव.<br>(ब) कर्ज खाते क्रमांक , कर्जाची रक्कम व कर्ज वाटप केल्याचा दिनांक.<br>(क) कर्जाचा व्याजदर व कर्जाचे परत फेडीचे हप्ते किती व कसे.<br>(ड) सदर प्रकल्पासाठी बचत गटाचे किती अंशदान आहे याचा उल्लेख<br>(इ) बचत गटाने काढलेल्या कर्जावर शासनाकडून अन्य सवलत/सबसिडी अनुदान मिळाले असल्यास त्याचा उल्लेख असावा.<br>(६) प्रकल्पाचा विमा काढल्याची छायांकित प्रत.<br>(७) बचत गटाने सुरु केलेल्या प्रकल्प / कर्जा बाबत जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांचा प्रत्यक्ष पाहणी अहवाल.<br>(८) महिला बचत गटाचे शासनाकडे रजिस्ट्रेशन झाल्याबाबतच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत. | ३० दिवस | उपसंचालक (पुनर्वसन), सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य , पुणे. दुरध्वनी :- ०२०/७१००२६०५, ०२०/७१००२६२९ | संचालक, सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे, दुरध्वनी ०२०/७१००२६०१ |

Department of Sainik ... Ghorpadi, Pune

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३४ | अंत्यविधीसाठी आर्थिक मदत | १) लाभार्थीचा सविस्तर अर्ज<br>२) डी.डी. ४० सर्व माहितीसह<br>३) ओळखपत्राची छायांकित प्रत<br>४) मृत्युचा दाखला<br>५) माजी सैनिक अथवा त्यांच्या पत्नी या पैकी एकच हयात असल्यास व त्यांचा ज्यांनी सांभाळ केला व मृत्युनंतर अंत्यविधी केला त्या वारसाचे प्रतिज्ञापत्र प्रकरणासोबत जोडणे जरुरी आहे. | ७ दिवस | जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी / जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय | उपसंचालक (पुनर्वसन), सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य , पुणे. दुरध्वनी :- ०२०/७१००२६०५, ०२०/७१००२६२९ |
| ३५. | माजी सैनिकांना ग्राम सेवक व शिक्षक पदाची शैक्षणिक अर्हता पूर्ण करण्यासाठी शिक्षण पूर्ण करण्यासाठी | १) लाभार्थीचा अर्ज<br>२) डी.डी. ४० सर्व माहितीसह.<br>३ ) ओळखपत्राची छायांकित प्रत.<br>४) माजी सैनिक कोणते प्रशिक्षण घत आहे याबाबतचे संस्थेचे प्रमाणपत्र /दाखला.<br>५) शुल्क भरल्याची मूळ पावती.<br>६) गुण पत्रकांची स्वाक्षांकित प्रत | ७ दिवस | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे |
| ३६. | आजी/माजी सैनिकांच्या मुला / मुलींसाठी वसतीगृहात प्रवेश | या योजनेचा लाभ घेण्यासाठी आवेदन पत्र संबंधित जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाकडून विहीत नमून्यात दिला जातो. | अर्जदाराकडुन आवेदन पत्र प्राप्त झाल्यानंतर घोषीत कार्यक्रमानंतर | वरील प्रमाणे | उपसंचालक (सैनिकीकरण), सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य , पुणे. दुरध्वनी :- ०२०/७१००२६०५, ०२०/७१००२६०६ |

Department of Sainik Welfare, Ghorpadi, Pune. सत्यमेव जयते

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३७. | माजी सैनिकांना नोकरीसाठी पुरस्कृत करणे | मागणीनुसार पात्र माजी सैनिक/विधवा यांची जेष्ठतेनुसार एकास पाच या प्रमाणात यादी पाठविण्यात येते | विविध सरकारी / निमसरकारी /खाजगी संस्था /बँका यांच्याकडुन जिल्हा सैनिक कार्यालयास प्राप्त झालेल्या मागणीनुसार | वरील प्रमाणे | उपसंचालक (पुनर्वसन),<br>सैनिक कल्याण विभाग,<br>महाराष्ट्र राज्य , पुणे.<br>दुरध्वनी :-<br>०२०/७१००२६०५,<br>०२०/७१००२६२९ |
| ३८. | माजी सैनिक व त्यांच्या विधवा यांना दुसरे महायुध्द अनुदान | १) लाभाथीर्चा अर्ज<br>२) ओळखपत्राची छायांकीत प्रत<br>३) विहीत नमुन्याचा अर्ज<br>४) वयाचे प्रमाण पत्र<br>५) Service Particular ची छायांकीत प्रत<br>६) अर्ज दारास इतर शासकीय अनुदान मिळत नसल्याबाबतचे प्रमाणत्र | १५ दिवस | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे |
| ३९. | माजी सैनिकाचे ओळखपत्र | १) माजी सैनिक/विधवा यांचा अर्ज<br>२) २) PPO ची झेरॉक्स<br>३) Service particular<br>४) २ फोटो<br>५) विधवांसाठी माजी सैनिकांचा मृत्युचा दाखला | १ दिवस | वरील प्रमाणे | उपसंचालक (प्रशासन),<br>सैनिक कल्याण विभाग,<br>महाराष्ट्र राज्य , पुणे.<br>दुरध्वनी :-<br>०२०/७१००२६०५,<br>०२०/७१००२६०२ |

Department of Sainik Welfare * Ghorpadi, Pune * सत्यमेव जयते

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४० | महाराष्ट्र गौरव पुरस्कार (फक्त शौर्यपदक विजेत्या सैनिकांसाठी) | १) लाभार्थीचा अर्ज<br>२) विहीत नमुन्याप्रमाणे विशिष्ट माहिती<br>३ ) शौर्यपदक प्राप्त झाल्याबाबतचा पुरावा (प्रमाणपत्र )<br>४) आधिवास प्रमाणपत्र | प्रकरण शासनास १ महिन्याच्या आत सादर करण्यात येते | उपसंचालक (पुनर्वसन), सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य , पुणे. दुरध्वनी :- ०२०/७१००२६०५ , ०२०/७१००२६२९ | संचालक, सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे, दुरध्वनी ०२०/७१००२६०१ |
| ४१ | विधवा /अवलंबितांना मासिक अनुदान | १) लाभार्थीचा अर्ज<br>२) विहीत नमुन्याप्रमाणे विशिष्ट माहिती<br>३ ) शौर्यपदक प्राप्त झाल्याबाबतचा पुरावा (प्रमाणपत्र )<br>४) आधिवास प्रमाणपत्र | प्रकरण जिल्हयाकडून प्राप्त झाल्यानंतर १५ दिवस | उपसंचालक (पुनर्वसन), सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य , पुणे. दुरध्वनी :- ०२०/७००१२६०५ , ०२०/७००१२६०४ | संचालक, सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे, दुरध्वनी ०२०/७१००२६०१ |
| ४२. | शहीद वारस अर्थसहाय्य सुवर्ण महोत्सवी वर्ष योजने मार्फत आर्थिक सहाय्य | १) लाभार्थीचा अर्ज<br>२) विहीत नमुन्याप्रमाणे विशिष्ट माहिती<br>३ ) ओळख पत्राची छायांकित प्रत<br>३) डिस्चार्ज पुस्तक किंवा सर्विस पर्टिकुलरची स्वांक्षांकित प्रत<br>४) वारसाचा दाखला | १५ दिवस | जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी / जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय | उपसंचालक (पुनर्वसन), सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य , पुणे. दुरध्वनी :- ०२०/७००१२६०५, ०२०/७००१२६०४ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४३. | पंतप्रधान शिष्यवृत्ती योजना | On line application on ksb.gov.in | | | |
| ४४ | केंद्रिय सैनिक बोर्ड , AFFD Fund मधून गंभिर अजारासाठी आर्थिक मदत (सैन्यसेवा निवृत्ती वेतन मिळत नसलेल्या माजी सैनिक / विधवाना लागू आहेत) | On line application on ksb.gov.in | | | |
| ४५. | केंद्रिय सैनिक बोर्ड , रक्षामत्री सहायता फंडातून देन्यात येणाऱ्या आर्थिक मदती | केंद्रिय सैनिक बोर्ड यांचे पत्र क्र. ११९/KSB/B/RMDF/२०१० दि. १९.१०.२०११ मध्ये नमूद आर्थिक मदतीप्रमाणे कागदपत्रे<br>१) लाभार्थीचा अर्ज<br>२) ओळखपत्राची छायांकीत प्रत<br>३) विहीत नमुन्याचा अर्ज<br>४) डिस्चार्ज पुस्तकाची छायांकित प्रत<br>५) मासिक उत्पन्न रु. ६०००/- च्या आत असल्याबाबत तलाठी/बीडीओ/सरपंच यांचा उत्पन्नाचा दाखला<br>६) वयाबाबतचा पुरावा | प्रकरण केंद्रीय सैनिक बोर्ड नवी दिल्ली यांना ७ दिवसाच्या आत सादर करण्यात येते. | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे |
| ४६. | AGs Branch, AHQ यांचेकडून ACW Fund मधून युध्द विधवा/अपंग माजी सैनिक यांना आर्थिक मदत | Rehabilitation & Welfare Section, AG,s Branch, Army HQ पत्र क्र.B/४५३९१/Policy/AG/R& W३ दि. २७.०७.२००३ तसेच सैनिक कल्याण विभागाचे पत्र क्र. १६००२/ACWF/धोरण/सैकवि-१६ दिनांक ०९ सप्टेबर २००२ मध्ये नुमूद योजनानुसार ü कागद पत्रे | प्रकरण AG,s Branch, Army HQ नवी दिल्ली यांना ७ दिवसाच्या आत सादर करण्यात येते. | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे |

Department of Sainik Welfare • Ghorpadi, Pune •